▶ वर्ष–३
■ अंक–३५

दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

दिवा न्यूज
न्यूज पेपर पार्कमध्ये उपलब्ध
वर्तमान पत्र वाचण्यासाठी
खालील लिंक वर करा क्लिक
https://epaper.newspaperpark.com/edition/2033/Diwa%20News



# कल्याण लोकसभेची लढत धनुष्यबाण विरुद्ध मशाल अशी थेट झाल्यास कुणाचं पारडं जड असेल?

शिवसेना

शिवसेना
उद्धव बाळासाहेब ठाकरे

**दिवा न्यूज विशेष**

कल्याण लोकसभेच्या निवडणूकीकडे राज्याचे लक्ष लागणार हे आता जवळपास निश्चित झाले आहे. या लोकसभा मतदारसंघात धनुष्यबाण विरुद्ध मशाल अशी सरळ लढत झाल्यास नेमकी बाजी कोण मारणार याकडे अनेकांचे लक्ष लागले आहे.शिवसेना फुटी नंतर कल्याण लोकसभा क्षेत्रातील बहुतांश पदाधिकारी हे शिंदेंच्या शिवसेनेकडे गेले असले तरी येथील राजकीय परिस्थितीचा अंदाज अनेक राजकीय विश्लेषकांना येत नसल्याने, त्याचबरोबर युतीमध्ये असणाऱ्या अंतर्गत मतभेदाचा फटका उमेदवाराला बसेल का? याची शक्यता वर्तवली जात असल्याने ही लढत अधिक रंगतदार होणार आहे. शिवसेनेचे विद्यमान खासदार श्रीकांत शिंदे यांचे या भागात खासदार म्हणून काम आहे. मागील दहा वर्षात त्यांनी विविध प्रकल्प, पायाभूत सुविधा, रेल्वेचे प्रश्न यासाठी प्रयत्न केल्याचे नाकारता येत नाही. झालेली विकासकामे आणि मतदारसंघात दिलेला भरघोस निधी ही श्रीकांत शिंदे यांची जमेची बाजू आहे. मात्र दुसरीकडे शिवसेना फुटी मुळे ठाकरेंच्या शिवसेनेला असलेली सहानभूती याचा अंदाज अद्याप कुणालाही आला नसल्याने नेमकं निवडणूक चित्र काय असेल हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. त्यात ठाकरे यांच्या शिवसेनेकडून धर्मवीर आनंद दिघे यांचे पुतणे व ठाणे जिल्हाप्रमुख केदार दिघे यांचे नाव चचत असल्यान कल्याण लाकसभत दिघे विरुद्ध शिंदे अशी थेट लढत झाल्यास नेमका मतदारांचा कल कोणाच्या बाजून जाईल याबाबतही अद्याप चित्र स्पष्ट नाही.केदार दिघे यांचे नाव चर्चेत आणून ठाकरेंच्या शिवसेनेने या मतदारसंघातील चुरस वाढवली आहे. कल्याण लोकसभा मतदारसंघात धनुष्यबाण विरुद्ध मशाल ही दोन शिवसेनेमधील लढत राज्याचे लक्ष वेधून घेणारी ठरेल अशी सध्याची परिस्थिती आहे. एकीकडे ठाकरे गटाच्या शिवसेनेला कल्याण लोकसभेत उमेदवार मिळत नाही अशी चर्चा शिंदेंच्या शिवसेनेकडून होत असताना अचानक केदार दिघे यांचे नाव पुढे आल्याने या निवडणुकीतील चुरस वाढली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा कल्याण लोकसभा हा गड आहे. या भागात विकास कामांसाठी भरघोस निधी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून देण्यात आला आहे.

पक्ष संघटना देखील या भागात शिंदेंच्या शिवसेनेकडे आहे. दुसरीकडे भाजपमधून होणाऱ्या कुरबुऱ्या आणि उद्धव ठाकरे यांच्या बाबत असणारी सहानुभूतीची लाट याचा नेमका अंदाज जोपर्यंत येत नाही तोपर्यंत ही लढत एकतर्फी होईल असे सध्याचे चित्र नाही. श्रीकांत शिंदे यांच्या विरोधात केदार दिघे हे उमेदवार असतील तर ही लढत राज्याचे लक्ष वेधून घेणारी ठरेल असा राजकीय विश्लेषकांचा अंदाज आहे.

# पाणी बिलांची थकबाकी, नळ जोडणी बंद करण्याची कारवाई वेग घेणार

(सविस्तर बातमी पान ८ वर)

SHWAAS
ACE NX HOSPITAL & RESEARCH CENTRE
Superspeciality Hospital
Our Passion Your Care

२५,००० ते २,००,००० पर्यंत विमा योजना



मुख्यमंत्री सहायता निधी
CM Relief Fund

- फुफ्फुस प्रत्यारोपण
- हिप रिप्लेसमेंट
- अपघात शस्त्रक्रिया
- कर्करोग (केमोथेरपी/रेडिएशन)
- लहान बालकांचे शस्त्रक्रिया
- अपघात
- हृदयरोग
- डायलिसिस
- हाताचे प्रत्यारोपण
- गुडघ्यांचे प्रत्यारोपण
- विद्युत अपघात रुग्न
- नवजात शिशुंचे आजार
- बर्न रुग्न
- मेंदूचे आजार
- कर्करोग शस्त्रक्रिया

Address
Mahavir height, Golul Nagari, opp. Mumbai University, Wayle Nagar, Khadakpada, Kalyan, Maharashtra- 421301

Emergency
7777008464
9076229076

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. १ एप्रिल २०२४
पान : २
www.diwanews.com

# स्वस्तात कपड्यांची जाहीरात करुन ऑनलाईन फसवणूक करणाऱ्या त्रिकुटाला अटक

**१२०० ग्राहकांची फसवणुक केल्याचे उघड**



**ठाणे :** इन्स्टाग्राम अकाऊंटद्वारे स्वस्तात कपड्यांची जाहिरात करुन ऑनलाईन फसवणूक करणाऱ्या त्रिकुटाला ठाणे पोलिसांनी अटक करत, त्यांनी आतापर्यंत सुमारे १२०० जणांची आर्थिक फसवणुक केल्याची तपासात पुढे आली आहे. त्यांना येत्या २ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी मिळाल्याची माहिती पोलिसांनी दिली. मुंब्र्यातील सुफीयान शफीक खान (२३) , फुरकान रिजवान खान (२०) आणि कामरान इस्माईल शेख (१९) अशी अटक केलेल्या त्रिकुटाची नवे आहेत.

ऑनलाईन फसवणुकीचे प्रकार दिवसेंदिवस वाढत असल्याने त्यासंदर्भात ठाणे पोलिसांनी पावले उचलली होती. त्यात २० मार्च रोजी मुंब्र्यातून परिमंडळ १ ठाणे कार्यालयात तक्रार दाखल झाली होती. त्यानुसार काही इसम हे मागील दोन ते अडीच वर्षापासून फेक इन्स्टाग्राम ऑनलाईन अकाऊंट बनवून त्याद्वारे कपड्यांची स्टेट्स द्वारे जाहीरात करीत आहेत. त्यांचे अकाऊंट वरील स्टेटस पाहिले असता ते ग्राहकांना कपडे आवडल्यास इन्स्टाग्राम अंकाऊंट वरील व्हॉट्सॲप लिंक वर जाऊन त्यांना केवळ हाय असा मेसेज केल्यास तत्काळ प्रतिउत्तर देतात व त्यांच्याकडे मेसेजद्वारे त्याचे पूर्ण डिटेल ज्यामध्ये नाव, मोबाईल क्रमांक, कपड्यांची साईज अशी माहिती मागतात व त्यामध्ये नो कॅश ऑन डिलीव्हरी असे नमुद करुन पुढील ७ ते १२ दिवसात बुकींग केलेला माल न मिळाल्यास पैसे परत केले जातील असे लिहून मेसेज फॉरवर्ड करतात. पसंतीत पडलेल्या कपड्यांच्या अमिषाला बळी पडून काही ग्राहक हे पैसे पाठवत होते. परंतु कपडे न मिळाल्याने ते फोन किंवा मेसेज केले असता, त्यांचा नंबर तत्काळ ब्लॉक केला जात होता. अशा पध्दतीने ते ग्राहकांची फसवणुक करीत असल्याची माहिती पुढे आली होती.

त्यानुसार बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे संशयीत इसम ांचे इन्स्टाग्राम अकाऊंटवर संपर्क करुन त्याची खात्री केली. त्यानंतर त्यांचे लोकेशन मागवून त्यांच्या मुंब्रा येथील राहत्या घरी छापा टाकला असता, ते त्याठिकाणी आढळून आले. त्यांच्याकडे अधिक तपास केला असता, तसेच त्यांचे मोबाइल तपासले असता, त्यात १ हजार ते १२०० नंबर त्यांनी ब्लॉक केल्याचे आढळून आले आहे. त्यातही हे तीघे बँक अकाऊंट देखील दुसऱ्याच व्यक्तीचा दिला जात होता. त्याच्या खात्यातून ते पैसे वळते करत असते, तसेच संबधींताला देखील काही हिस्सा देत होते. अशी माहिती देखील तपासात पुढे आली आहे. तर ब्लॉक केलेल्या यादीतील एक नंबर हा कळवा भागातील राहणाऱ्या ग्राहकाचा आढळून आला. त्याला बोलावून विचारणा केली असता, आपली फसवणुक झाल्याचे त्याने सांगितले. तर अशा प्रकारच्या ऑनलाईन अमिषांना बळी पडू नका असे आवाहन परिमंडळ १ चे पोलीस उपायुक्त सुभाष बुरसे यांनी दिली.

# पत्र्याच्या गोडाऊनला आग



**ठाणे:** कामगारांच्या निवाऱ्यासाठी व कंपनीकडील साहित्य स्टोअर करण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात उभारण्यात आलेल्या पत्र्याच्या गोडाऊनला आग लागल्याची घटना नुकतीच समोर आली. ही आग जवळपास सव्वा तासांनी नियंत्रणात आणण्यात अग्निशमन दलाच्या जवानांना यश आले. ही आग लागली तेंव्हा २५ कामगार त्या गोडाऊनम ध्ये होते. ते सर्व जण सुरक्षितेच्या कारणास्तव बाहेर आले होते. या आगीत मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी दिली

साकेत टॉवरच्या जवळ साकेत ब्रिज दुरुस्तीच्या कामाकरिता असलेल्या कामगारांच्या निवाऱ्यासाठी व साहित्य स्टोअर करण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात उभारलेल्या पत्र्याच्या गोडाऊनला आग लागल्याची माहिती मिळताच घटनास्थळी राबोडी पोलीस, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेतली. तसेच तातडीने त्या आगीवर नियंत्रण मिळविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले. त्यानंतर कुठे ती आग सव्वा तासांनी नियंत्रणात आणण्यात यश आले. या आगीत कोणालाही दुखापत झालेली नसून त्या गोडाऊनमध्ये पॉलिमर केमिकल, फायबर बनविण्याकरीता वापरण्यात येणारे केमिकल, थिनर, ग्राइंडर, ब्रेकर, इतर साहित्य साठा करून ठेवण्यात आले होते. ते सर्व पूर्णपणे जळाले आहे.तसेच २५ कामगार तेथे राहत होते. ते वेळीच बाहेर पडल्याने बचावले. तसेच यावेळी ०१- फायर वाहनासह, ०१-हायराईज फायर वाहन, ०१ रेस्क्यु वाहन, ०१ वॉटर टँकर पाचारण करण्यात आले होते.

# अल्पवयीन मुलाच्या हत्याप्रकरणी दोघा सख्या भावांना अटक

**ठाणे:** अल्पवयीन मुलावर अनैसर्गिक अत्याचाराचा प्रयत्न करत, त्याची हत्या करणाऱ्या सख्या भावांना ठाणे शहर पोलिसांच्या शीळ डायघर पोलिसांनी अटक केली. रम जान मोहम्मद कुद्दुस शेख (२०) आणि त्याचा मोठा भाऊ मोहम्मद आझाद कुद्दुस शेख (३०) असे अटकेतील भावांची नावे असून त्यांना येत्या २ एप्रिल पर्यंत पोलीस कोठडी मिळाली असल्याची माहिती शनिवारी ठाणे शहर परिमंडळ १चे पोलीस उपायुक्त सुभाष बुरसे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

हत्या झालेला अल्पवयीन मुलगा २५ मार्च रोजी घरातून खेळण्यास बाहेर गेला होता. परंतु बराच वेळ झाला तरी घरी परतला नसल्याने त्याच्या आईने २६ मार्च पोलीस ठाण्यात धाव घेत, अपहरणाची दिलेल्या तक्रारानुसार शीळ डायघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याचदरम्यान नवी मुंबईतील तळोजा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आडीवली किरवली गावाजवळील ओढ्यातील पाण्याच्या डबक्यात हातपाय बांधलेल्या व डोक्यास जखमा असलेल्या एक बालक मृतावस्थेत आढळून आला. त्याची ओळख पटल्यानंतर शीळ डायघर, मुंब्रा,कळवा गुन्हे प्रकटीकरण या पथकांनी सखोल तपास करत, दोघांना २७ मार्च रोजी अटक केली. तसेच त्यांनी त्या गुन्ह्याची कबुली देत, रमजान याने मयत याच्या अनैसर्गिक अत्याचाराचा प्रयत्न केला होता. तसेच त्याला मयत म ुलाने विरोध केल्याने रमजान दगडाने त्याच्या डोक्यावर प्रहार केला. त्यानंतर कपड्याने गळा आवळून हत्या केली.

तसेच भाऊ मोहम्मद यांच्या मदतीने हात पाय बांधून त्याला ओढ्याच्या डबक्यात फेकून पळ काढला होता. या गुन्ह्यात आणखी कोणाचा सहभाग आहे का याचा शोध सुरू आहे. अशी माहिती पोलिसांनी दिली. पुढील तपास वरीष्ठ पोलीस निरीक्षक संदीपान शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

# दिव्यात शिवसेना तिसाई नगर शाखा आयोजित शिवजयंती निमित्त दशावतार नाटकाला नागरिकांचा प्रतिसाद





**दिवा:–** दिवा शहरातील शिवसेना शाखा तिसाई नगर शाखा, आयोजित शिवजयंती उत्सवानिमित्त दशावतार नाटकाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मा.उपम हापौर व शहर प्रमुख रमाकांत मढवी यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवार, २८ मार्च रोजी तिथीनुसार शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

सकाळी स्वराज्य प्रतिष्ठान शिवगर्जना मित्र मंडळ यांच्या सहभागाने शिवज्योत आगमन किल्ले दुर्गाडी कल्याण ते शिवसेना शाखा तिसाई नगर दातिवली येथे झाले.यावेळी शाळेय विद्यार्थ्यांना वस्तू वाटप करण्यात आले .सायं. ६ ते ७ वा. श्री सोमजाई प्रासादिक भजन मंडळ, दिवा,रायगड भूषण बुवा श्री संतोष कानु शितकर यांचे भजन, रात्री (कुडाळ साळगांव) चे सुप्रसिद्ध नाट्य मंडळाचे ओमकार दशावतार नाट्य आयोजित करण्यात आले होते. शिवसेना शाखा तिसाई नगर, शाखाप्रमुख निलेश रोहिदास म्हात्रे, उपशाखाप्रमुख, गटप्रमुख, महिला शाखा संघटक, उपशाखा संघटक, गट संघटक, व समस्त शिवसैनिक यांनी या उपक्रमाचे आयोजन केले होते.




# दिव्यात इंद्रधनु मित्र मंडळाची शिवजयंती उत्साहात संपन्न

**दिवा:–** दरवर्षीप्रमाणे यावर्षीही दिवा शहरातील इंद्रधनु मित्र मंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची तिथीनुसार जयंती मोठ्या उत्साहात संपन्न झाली .शहरातील चारभुजा दुकान समोर, दिवा शिळरोड, येथे सार्वजनिक शिवजयंती साजरी करण्यात आली. सकाळी १०. वा.शिव प्रतिमेचे पूजन,साय.५. वा. भव्य मिरवणूक काढण्यात आली.यावेळी दिव्यातील शेकडो शिवभक्त मोठ्या संख्येत उपस्थित होते. इंद्रधनु मित्र मंडळाचे अध्यक्ष तुषार पाटील, उपाध्यक्ष गणेश पाटील, खजिनदार प्रशांत पाटील, सचिव भानुदास पाटील, उपसचिव प्रशांत गावडे, सुदाम भोईर, शंकर भोईर व पदाधिकारी व महिला उपस्थित होत्या.








दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

सोमवार, दि. १ एप्रिल २०२४



## झाड कोसळल्याने चारचाकी गाडीसह भिंतीचे नुकसान

**ठाणे:** तुळशीधाम या ठिकाणी असलेल्या कल्याणी सोसायटीच्या आवारातील झाड भैरवी सोसायटीच्या आवारात पार्क केलेल्या चारचाकी गाडीवर आणि सुरक्षा भिंतीवर पडल्याची घटना मंगळवारी दुपारी पावणे तीन वाजण्याच्या सुमारास समोर आली.या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसली तरी, गाडीच्या बोनेट आणि भिंतीचे नुकसान झाले आहे. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेत, ते झाड कापून एका बाजूला केले. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

## यशोधन नगर बस स्टॉप नसल्याने नागरिकांना उन्हात उभे राहून पहावी लागते बसची वाट




**ठाणे :** पंधरा दिवसांपूर्वी एका टेम्पो च्या धडकेने यशोधन नगर बस स्टॉप उखडला गेला. येथील प्रवाशी नागरिकांना उन्हात उभे राहून बस ची वाट पाहावी लागत आहे. उन्हाचा कडाका वाढला असून शालेय विद्यार्थी,जेष्ठ नागरिक तसेच महिला यांना त्रास सहन करावा लागत आहे. याची दखल घेत स्वराज्य सामाजिक संस्थेतर्फे ठाणे परिवहन अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.सदर बस स्टॉप लवकरात लवकर बसविण्यात येईल असे आश्वासन अधिकाऱ्यांमार्फत याप्रसंगी देण्यात आले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संजय देवकर तसेच राजीव शिरोडकर,प्रमिला भांगे,रेश्मा देवकर,सविता धुमाळ,हेमांगी पांचाळ,नारायण भालेकर,दिनेश शेट्ये,शाहू कदम,विजय सावंत,बाळा परब बाळा भाट आदी उपस्थित होते.

## ... तर मला बिनविरोध निवडून द्यावे



### राजन विचारे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना डिवचले

**ठाणे:** ठाण्यात निष्ठावंत विरुद्ध गद्दार अशी लढाई होणार आहे. नक्कीच या सच्चाईला ठाणेकर, नवी मुंबईकर असेल या मीरा-भाईंदरकर या ठिकाणी मला साथ देतीलच. परंतु विरोधकांना अद्यापही उमेदवार मिळत नसेल तर मला वाटतंय त्यांनी मला बिनविरोध निवडणूक द्यावे, असा चिमटा ठाणे लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार तथा विद्यमान खासदार राजन विचारे यांनी काढत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना डिवचण्याचे काम केले.

गुरूवारी २८ मार्च रोजी असलेल्या शिवजयंतीचे औचित्य साधून ठाण्याच्या मासुंदा तलाव येथील अश्वारूढ असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करत तसेच महाराजांचे आशीर्वाद घेत, विचारे यांनी प्रचाराच्या कामाला सुरू केली. यावेळी त्यांच्यासोबत इंडिया आघाडीतील काँग्रेस ठाणे जिल्हाध्यक्ष विक्रांत चव्हाण, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे ठाणे जिल्हाध्यक्ष सुहास देसाई आदी उपस्थित होते. याचदरम्यान, एकीकडे ठाकरे गटाने ठाणे लोकसभेचा उमेदवाराची घोषणा केली तरी सुद्धा दुसरीकडे शिंदे गटाला अद्यापही उमेदवार मिळत नाही. त्यामुळे विचारे यांनी मुख्यमंत्री शिंदे यांना डीवचण्याची संधी सोडली नाही.

पुढे बोलताना, विचारे यांनी आज हिंदुस्थानाचे दैवत छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती आहे आणि आज या पवित्र दिवशी या ठिकाणी इंडिया आघाडीचे सर्व कार्यकर्ते या ठिकाणी नतमस्तक होण्यासाठी आलेले आहेत. जसं छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्यावेळेला हिंदवी स्वराजाची निर्माण केली, त्यावेळेस सर्व जाती-धर्माच्या लोकांना बारा बलुतेदार १८ बगड जाती त्याच बरोबर सर्व जाती-धर्माच्या लोकांना एकत्र करून हिंदवी स्वराज्य निमर्ण केली. त्याच पद्धतीने आज या महाराष्ट्रामध्ये चांगले स्वराज्य निर्माण करायचे असेल तर छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श घेऊन आपल्याला पुढे जावा लागेल असे आवाहन करताना, दुसरीकडे विचारे या देशांमध्ये ज्या पद्धतीने सर्व पक्ष फोडण्याचे काम सुरू आहे. तसेच भ्रष्टाचारी लोकांना त्या ठिकाणी जवळ करण्याचे काम केले जात आहे. या सर्व गोष्टींचा सबंध लक्षात घेता, ही जनता सुद्धा त्यांना कंटाळलेली आहे, अशी टीका नाव न घेता,भाजप सरकारवर विचारे यांनी केली. आणि या ठाण्यामध्ये निष्ठावंत विरुद्ध गद्दार अशी लढाई होणार आहे. असे उद्गार काढून विचारे यांनी मुख्यमंत्री शिंदे यांनी डीचवले.

## सुट्टीने केला सेल्समनचा घात

### परराज्यात स्थायिक होण्याचा मनसुबे उधळून पोलिसांनी केली सेल्समन अटक

**ठाणे :** दारू पिण्यासाठी केलेली केलेली चोरी मालकाच्या लक्षात आली नाही. त्यातच मालकाचा विश्वासू असल्याने मोठ्या प्रमाणात सोने चोरी करुन परराज्यात स्थायिक होण्याचा मनसुबा आखणारा सेल्समन राहुल मेहता यास नौपाडा पोलिसांना अटक केली आहे.

ही चोरी तो ज्या दिवसांपासून कामाला जाण्यास बंद झाल्यावर त्याचे काम दुसऱ्या सेल्समनला दिल्यावर उघडकीस आली. याचदरम्यान त्याच्या पत्नीने तो बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली. त्यातूनच तो मीरा रोड येथे मैत्रिणीला भेटण्यासाठी येणार असल्याची माहिती पोलिसांनी मिळाल्यावर त्याच्या मुसक्या आवळून १ कोटी ५ लाखांची चोरीचा गुन्हा उघडकीस आणला. त्याच्याकडून चोरीस गेलेल्या दागिन्यापैकी सुमारे ६२ लाख १० हजार रुपयांचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. अशी माहिती पोलीस उपायुक्त सुभाष बुरसे यांनी दिली.

राहुल जयंतीलाल मेहता असे अटक करण्यात आलेल्या सेल्समनचे नाव असून तो ठाण्यातील गावदेवी मैदानाजवळील अशोका हाईटस इमारतीत राहतो. तो ठाण्यातील डॉ. मुस रोड भागात असलेल्या राजवंत ज्वेलर्समध्ये सेल्समन म्हणून काम करीत होता. दुकानातील विक्रीकरिता दिलेले दागिन्यांचा दररोज त्याला हिशोब द्यावा लागत होता आणि तो त्याच्या लॉकरमध्ये ठेवत होता. मालक सुरेश पारसमल जैन यांचा त्याच्यावर विश्वास होता आणि यामुळेच त्याने दिलेला हिशोब योग्य असल्याचे ते मानत होते. परंतु ८ मार्च २०२३ रोजी राहुल हा कामावर आला नसल्यामुळे त्याचे काम दुसऱ्या सेल्समनकडे सोपविण्यात आले. त्यावेळी १ कोटी ५ लाख किंमतीचे सोन्याचे दागिने घेऊन राहुल फरार झाल्याचे मालकाच्या निदर्शनास आले.

याप्रकरणी मालक सुरेश जैन यांनी दिलेल्या तक्रारीच्या आधारे नौपाडा पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, सह पोलीस आयुक्त डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण, अप्पर पोलीस आयुक्त विनायक देशमुख, पोलीस उपायुक्त सुभाष बुरसे, सहाय्यक पोलीस आयुक्त प्रिया ढाकणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभय महाजन, पोलिस निरिक्षक (गुन्हे) शरद कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरिक्षक मंगेश भांगे यांच्या पथकाने तपास करून राहुलला मिरारोड येथून अटक केली. त्याच्याकडून चोरीस गेलेल्या दागिन्यापैकी २६ नेकलेस, २१ कानातील कर्णफुले, ३ गळ्यातील चैन असे सुमारे ६२ लाख १० हजार रुपयांचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. उर्वरित दागिन्यांबाबत त्याच्याकडे चौकशी सुरू आहे, अशी माहिती पोलीस उपायुक्त सुभाष बुरसे यांनी दिली.



# नालेसफाईची कामे १५ एप्रिलपासून सुरू करावीत – आयुक्त सौरभ राव यांनी दिले निर्देश



## आयुक्तांनी घेतला मान्सूनपूर्व तयारीचा आढावा



**ठाणे : नालेसफाईची निविदा प्रक्रिया पूर्ण करून १५ एप्रिलपासून महापालिका क्षेत्रातील नालेसफाईची कामे सुरू करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी मान्सूनपूर्व आढावा बैठकीत दिले. त्याचबरोबर, अतिधोकादायक इमारती रिकाम्या करण्यासाठी कृती आराखडा तयार करण्याच्या सूचनाही आयुक्तांनी दिल्या.**

मान्सूनपूर्व तयारीचा आढावा घेण्यासाठी बुधवारी सायंकाळी महापालिका आयुक्तांच्या दालनात बैठक झाली. या बैठकीस, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, सर्व उपायुक्त, सर्व सहाय्यक आयुक्त, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. उपायुक्त (आपत्ती व्यवस्थापन) जी. जी. गोदेपुरे यांनी मान्सूनच्या काळात महापालिकेच्या विविध विभागांवर असलेल्या जबाबदाऱ्या, त्यासाठी करण्यात आलेली व्यवस्था याबद्दल सादरीकरण केले.

या बैठकीत, नालेसफाईची निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. त्याबद्दल उचित कार्यवाही करून ही प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी. तसेच, १५ एप्रिलपासून नालेसफाई प्रत्यक्षात सुरू केली जावी, असे निर्देश आयुक्त राव यांनी दिले.

त्याचबरोबर, महापालिका क्षेत्रातील ८६ अती धोकादायक इमारतींचा तातडीने आढावा घेण्यात यावा, असेही राव यांनी स्पष्ट केले. इमारत अतिधोकादायक असल्याबद्दल काही वाद असतील आणि त्यात त्रयस्थ संस्थेकडून लेखापरिक्षण करून घेण्यात येणार असेल तर तेही लगेच केले जावे. त्याच्या अहवालाचा पाठपुरावा करावा. अती धोकादायक इमारतीत रहिवासी रहात असतील तर त्या इमारती रिकाम्या करण्यासाठी आतापासूनच प्रयत्न करावेत. माणुसकीचा दृष्टीकोन ठेवून प्रत्येक इमारतीसाठी स्वतंत्र उपाययोजना करावी, असेही राव यांनी सांगितले.

अती धोकादायक इमारतींबाबत जनजागृती करावी, इमारत जीर्ण होत असेल तर त्यात कोणकोणती लक्षणे दिसतात, याचीही माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवण्यात यावी, अशी सूचनाही आयुक्त राव यांनी केली.

वंदना एसटी स्टॅण्डसारख्या सखल भागात पाणी साचू नये, त्याचा जलद निचरा व्हावा यासाठी काय उपाययोजना केल्या जात आहेत, याची माहितीही या बैठकीत आयुक्तांनी घेतली.

मान्सूनच्या काळात सर्व प्रमुख अधिकारी, आप्तकालीन सेवेत ज्यांच्यावर जबाबदारी आहे, असे सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांचे मोबाईल कायम संपर्क क्षेत्रात राहतील आणि त्यावर तत्काळ प्रतिसाद दिला जाईल, याची दक्षता घेण्याचे निर्देशही आयुक्तांनी दिले.

### ■ आपत्कालीन कक्षाला भेट

बैठकीनंतर, ठाणे महापालिका मुख्यालयालगत असलेल्या आपत्कालीन व्यवस्थापन कक्षाला आयुक्त राव यांनी भेट दिली. नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारी, माहिती त्यांना दिला जाणारा प्रतिसाद याची माहिती त्यांनी घेतली. तसेच, मान्सूनच्या चार महिन्याच्या काळात महावितरण आणि पोलीस यांचे सक्षम समन्वयक आप्तकालीन कक्षात असावेत, असे आयुक्त राव म्हणाले. त्यासाठी संबंधित यंत्रणांशी संपर्क साधून नियोजन करण्याचे निर्देश त्यांनी दिली. उत्तम समन्वयामुळे जलद प्रतिसाद मिळून आपत्तीची तिव्रता कमी होते, असे आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

### ■ टीडीआरएफची केली पाहणी

हाजूरी येथील टीडीआरएफच्या शिबिरालाही आयुक्त राव यांनी भेट दिली. या कृती दलाची साधनसामुग्री, गणवेश यांची पाहणी आयुक्तांनी केली. विविध मोहिमांमध्ये या कृती दलाला आलेला अनुभवही त्यांनी जाणून घेतला. आणखी कोणती साधनसामुग्री, प्रशिक्षण आवश्यक असल्यास त्याची मागणी लगेच नोंदवावी, असेही आयुक्तांनी या पथकाला सांगितले.

### ■ डाटा सेंटरचा वापर वाढवावा

स्मार्ट सिटीच्या माध्यमातून तयार करण्यात आलेल्या अदययावत डाटा सेंटरलाही आयुक्तांनी भेट दिली. हे सेंटर अद्ययावत आहे. त्यामुळे त्याचा वापर वाढवून कोणत्याही आप्तकालीन परिस्थितीचा अर्लट त्यांच्याकडून आपत्ती व्यवस्थापन केंद्राला जलद मिळावा, यासाठी नियोजन करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या. या भेटीदरम्यान, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, उपायुक्त (आपत्ती व्यवस्थापन) जी. जी. गोदेपुरे, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यासीन तडवी उपस्थित होते.




# गडकोटांचे संवर्धन झाले पाहिजे - हमीदा खान

**ठाणे :** गडकोटांमुळे इतिहासा बद्दल आदर निर्माण होतो, इतिहासाची माहिती, महती मिळते. नुसती भटकंती न करता आपण त्याचा अभ्यास करु लागतो असे मत गडरागिणी हमिदा खान यांनी व्यक्त केले. शिवसेवा मित्र मंडळ, ठाणे पूर्व वतीने आयोजित शिवजयंती उत्सव कार्यक्रमात व्यक्त केले. गडकोटांचे संवर्धन झाले पाहिजे. आज ते तग धरुन आहे, उद्या ते दिसणारच नाही. त्यामुळे आजच त्याची काळजी घेतली पाहिजे आणि ते जपण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे कळकळीचे आवाहन हमिदा यांनी केले. ६५० किल्ले सर करणाऱ्या दुर्गकन्या हमिदा यांची ''शिवाजीमहाराजांच्या गड-दुर्गांची भ्रमंती'' याविषयावर शिवकालीन नाणी संग्राहक, अभ्यासक प्रशांत ठोसर यांनी घेतलेल्या मुलाखतीत त्या बोलत होत्या. हमिदा यांनी ६५० किल्ले सर करताना आलेले अनुभव, अडचणी, मित्रांकडून मिळालेली प्रेरणा हे सांगत आप्पा परब यांनी दिलेले प्रोत्साहन याचा प्रवास उलगडला. माझी गड कोटांची सुरूवात १९९० साली रायगड पासून झाली खरी पण १९९८ साली रायगडला पुन्हा भेट दिल्यावर आप्पांनी रायगडच्या इतिहासाचा खडान खडा सांगितला त्यावेळी सगळेच गडकोट बघण्याचा निश्चय केला आणि १९९९ साली मी एका वर्षात १०० किल्ले सर केले. आप्पांनी गडकोटांची माहिती दिली नसती तर गडकोटांची भटकंती झाली नसती असे त्यांनी आवर्जुन नमूद केले. छत्रपती शिवरायांचे ३५० किल्ले पार करायला औरंगजेबला किती वेळ लागला असता हे त्यांचे किल्ले पाहिल्यावरच अनुभूती येते. सह्याद्रीतील गडकोट ही आपली दौलत आहे असा सह्याद्री आपल्याला लाभला याचा मला अभिमान आहे. स्वराज्याची दौलतच हे गडकोट आहेत. या गडकोटांमुळेच महाराजांना स्वराज्य जिंकता आले आहे. महाराजांचे हे गडकिल्लेच स्वराज्याचे साक्षीदार आहेत. काही किल्ले तग धरुन आहेत, काही नामशेष होत आहेत तर काहींचा शोध लागत आहे. नामशेष झालेल्या गडकोटांच्या चिराही आपल्यासाठी पूजनीय आहेत. काही किल्ल्यांमध्ये तर चक्क गाव वसले आहे त्यामुळे गडकोटांच्या खाणाखुणा शोधाव्या लागत आहेत पण त्या दिसल्या तरी महाराजांची प्रचिती येते अशा भावना हमीदा यांनी व्यक्त केल्या. सर्वांत आवडता किल्ला कोणता हे विचारल्यावर त्या म्हणाल्या की, रायगडा हा किल्ला मला अतिप्रिय आहे कारण त्यावर माझ्या राजांचा वास होता. शिवरायांच्या गडकोटांचे वैशिष्ट्य वेगळे आहे त्यामुळे एका किल्लयाची दुसऱ्या किल्ल्यासोबत तुलना करुच शकतन नाही असेही त्या म्हणाल्या.

रायगड, ही ट्रेकर्स मंडळीची पंढरी आहे. ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी अर्थात तिथीच्या दिवशी महाराजांचा राज्याभिषेक झाला. त्यादिवशी महाराज सिंहासनाधीष्वर झाले. या क्षणाचा रायगड हा साक्ष आहे. म्हणून ट्रेकर्स हे रायगडावर जाऊन, महाराजांना मुजरा करुन पुढची वाटचाल करत असल्याचे हमीदा यांनी शेवटी सांगितले.

या कायक्रमास इतिहास अभ्यासक, दुर्गभ्रमंती, ट्रेकर्स, कला आणि क्रीडा क्षेत्रातले अनेक म ान्यवरांनी आवर्जून उपस्थिती लावली होती. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मंडळाचे अध्यक्ष अजय नाईक यांनी केले. या संपूर्ण कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनात मंडळाचे कार्याध्यक्ष गिरीश राजे, सुभाष परब, सुभाष करंगूटकर, अमित ताम्हनकर, अक्षर पारसनीस, हेमंत प्रधान, आनंद गुरव यांच मोलाच सहकार्य लाभलं.

# ठाण्यात गुडघा प्रत्यारोपणासह खुब्याची रोबोटिक शस्त्रक्रिया

**ठाणे:** ठाण्यातील मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे या कॅश काऊंटर नसलेल्या भारतातील पहिल्या रुग्णालयामध्ये प्रथमच दोन गरजु म हिला रुग्णांवर रोबोटिक मशिनद्वारे गुडघ्याच्या प्रत्यारोपणाची अवघड शस्त्रक्रिया यशस्वीरित्या करण्यात आल्या आहेत. दोन्ही रुग्ण आता स्वतःच्या पायावर हिंडु फिरू शकत असल्याने त्यांच्या नातलगांनी या नविन रोबोटीक तंत्रज्ञानाचे तसेच, गंगुबाई शिंदे रुग्णालयाचे विशेष आभार मानले आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या दिवंगत मातोश्री गंगुबाई शिंदे यांच्या स्मरणार्थ ठाण्यातील किसननगर येथे हे कॅश काऊंटर नसलेले गंगुबाई संभाजी शिंदे रुग्णालय सुरू केले आहे. या रुग्णालयात तब्बल १२ लाख रुपये किमतीचे रोबोटिक गुडघा प्रत्यारोपण शस्त्रक्रियेचे मशिन नुकतेच कार्यन्वित करण्यात आले आहे. या मशिनद्वारे बदलापुर येथील पुष्पा केदारे ५० वर्षीय यांच्या उजव्या गुडघ्याचे प्रत्यारोपण करण्यात आले. केदारे यांना गेल्या तीन वर्षापासुन संधीवात झाल्याने त्यांचे पाय वाकडे झाले होते. बसायला व उठायलाही त्रास होत होता.तर, भिवंडीच्या बेबी गायकवाड ६६ वर्षीय महिलेच्या डाव्या पायाच्या गुडघ्याचे प्रत्यारोपण करण्यात आले. चालताना अडखळत चालावे लागत होते. गुडघ्याची शस्त्रक्रिया करण्यासाठी खाजगी रुग्णालयाचा लाखोंचा खर्च या रुग्णांना परवडणारा नव्हता. काही नातेवाईकाच्या संदर्भाने गंगुबाई शिंदे रुग्णालयाची माहिती त्यांना मिळाली. त्यानुसार रुग्णालयात दाखल केल्यानंतर येथील भुलतज्ज्ञ डॉ.अक्षय राऊत, अस्थीतज्ज्ञ डॉ. सचिन पांडे यांनी या दोन्ही रुग्णांच्या यशस्वी शस्त्रक्रिया नुकत्याच केल्या. याकामी रोबोटीक स्पेशालिस्ट तंत्रज्ञ दुर्गेश तोडणकर, तंत्रज्ञ अजित आहेर, राकेश सोनार यांचेही शस्त्रक्रियेसाठी मौलिक साह्य लाभले. या शस्त्रक्रियेनंतर केवळ एकच दिवस त्रास जाणवल्याचे रुग्णांनी सांगितले.



कॅश काऊंटर नसलेल्या भारतातील पहिले मातोश्री गंगुबाई शिंदे रुग्णालयात दोघींवर रोबोटिक शस्त्रक्रिया यशस्वी

रोबोटीक ही ओपन सर्जरी आहे. एक शस्त्रक्रिया करण्यासाठी साधारण सव्वा तासांचा अवधी लागला. एरव्ही मॅन्युअली ऑर्थोपेडीक ऑपरेशनमध्ये असलेले धोके या मशिनद्वारे केलेल्या शस्त्रकियेमध्ये टाळता येतात. या मशिनचा लाभ म्हणजे याद्वारे केलेल्या शस्त्रक्रियेत कोणतेही इन्फेक्शन्स होत नाहीत अथवा रक्तस्त्राव देखील कमीतकमी होत असल्याने रुग्णाला कोणताही मानसिक व शारीरिक त्रास उद्भवत नसल्याचे डॉ.पांडे यांनी सांगितले.

गुडघा प्रत्यारोपणासाठी आलेल्या रुग्णाच्या संपुर्ण शरीराचे सिटी स्कॅन केल्यानंतर ती सर्व माहिती रोबोटिक मशिनच्या संगणकीय मेमरीम ध्ये समाविष्ट केली जाते. त्यानंतर मशिनद्वारे शस्त्रक्रिया करण्यासाठी संगणकाद्वारे तयारी केली जाते. रोबोट, पेन्डन्ट, ओटीएस, सर्जिकल प्लॅनिंग केल्यानंतर रोबोट स्वतः ही गुडघा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करतो. शस्त्रक्रिये दरम्यान रुग्णाला फारसा त्रास जाणवत नाही. मात्र या शस्त्रक्रिया करताना डॉक्टरांना खूप काळजी घ्यावी लागते. दोनच दिवसात रुग्ण चालु लागतो. असे ऑर्थोपेडीक सर्जन डॉ.सचिन पांडे यांनी स्पष्ट केले

ठाण्यात गेली दोन वर्ष सुरू असलेल्या मातोश्री गंगुबाई संभाजी शिंदे या रुग्णालयाम ध्ये रुग्णाकडून कोणतेही शुल्क आकारले जात नाही. शिधापत्रिका धारक गरीब रुग्णांवर अत्यंत महागड्या शस्त्रक्रिया तसेच सर्व औषधोपचार इथे मोफत केला जातो. नुकतेच दोन महिला रुग्णावर रोबोटीक शस्त्रक्रिया करून गुडघ्याचे यशस्वी प्रत्यारोपण करण्यात आले. अशी माहिती रुग्णालयाचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. जालंदर भोर यांनी सांगितले.



## दिवा न्यूज वाचक पत्रे

### कोकण रेल्वे थांबा हवा

दिवा परिसरामध्ये कोकणी लोकांची फार वस्ती आहे. परंतु इथल्या कोकणवासियांना गावी जाताना ठाणे येथे गाडी पकडायला जावे लागते. तसेच गावावरून येताना ठाणे येथेच उतरावे लागते. तरी कोकण रेल्वेने कोकणवाशीय प्रवाशांच्या सोयीसाठी दिवा जंक्शन येथे सर्व कोकण एक्स्प्रेस गड्ययांना निदान १ मिनिटांचा थांबा द्यावा.

– **मनोहर परब**, धर्मवीर नगर, दिवा (पू.).

# महापालिका नवे आयुक्त येताच घोटाळ्यातील जुनी बिलं अदा करण्याचा सपाटा

## मनसेचा आरोप

### आयुक्तांनी याप्रश्नी वेळीच लक्ष द्यावे, अशी केली मागणी

**ठाणे:** लोकसभा निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागताच ठाणे महापालिकेच्या अधिकाऱ्यांची लगबग सुरू झाली आहे, ती नव्या आयुक्तांकडून घोटाळ्यातील कामांच्या बिलांची मंजूर काढत ठेकेदारांना बिल अदा करण्याची. नालेसफाईच्या घोटाळ्यात अडकलेल्या प्रकरणांची बिल काढण्याची प्रक्रिया मोठ्या प्रमाणावर पालिकेच्या घनकचरा व लेखा विभागाच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांनी काढण्याचा सपाटा लावला आहे असा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केला. तर, नव्या आयुक्तांनी याप्रश्नी वेळीच लक्ष द्यावे, अशी मागणी यावेळी मनसेचे स्वप्नील महिंद्रकर यांनी केली आहे.

२०२२-२३ या वर्षात नालेसफाई कामांचे कार्यादेश नसतानाही ठेकेदारांनी बेकायदेशीररित्या केवळ दिखाव्यासाठी नालेसफाईची काही ठिकाणी काम करून करोडो रुपयांचा अपहार केल्याचा प्रकार मनसेचे स्वप्निल महिंद्रकर यांनी उघडकीस आणला. त्यानंतर तत्कालीन आयुक्त अभिजीत बांगर यांनी यासंबंधित केलेल्या कामांची बिल न काढण्याचे आदेश दिले होते. पण आयुक्त अभिजीत बांगर यांची बदली होताच महानगरपालिकेच्या घनकचरा व लेखा विभागाच्या अधिकाऱ्यांनी संगनमत करून कार्यादेश नसलेल्या कामांची बिल काढण्याचा प्रताप घडून आणला आहे. महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येणारी नालेसफाई ही केवळ दिखाव्यापूर्ती असून प्रत्यक्षात नालेसफाईच्या नावावर फक्त हात सफाई केली जाते असा आरोप महिंद्रकर यांनी केला आहे. ही बाब वारंवार नागरिकांच्या वतीने महानगरपालिकेला निदर्शनास आणून देण्यात आली आहे. पण तरीही महानगरपालिकेचे अधिकारी नालेसफाईच्या आड मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार घडून करोडो रुपयाचे देयक लाटण्याचा खेळ वर्षानुवर्ष करत आले आहेत.

नालेसफाईच्या कामात पारदर्शकता यावी, यासाठी तत्कालीन आयुक्त अभिजीत बांगर यांनी मोठ्या प्रमाणावर उपयोजना केल्या होत्या. गेल्या वर्षाची नालेसफाई काही प्रमाणात पारदर्शक पद्धतीने करण्यात आली होती, पण २०२२ - २३ यावर्षी झालेल्या नालेसफाईत मोठा घोटाळा झाला असून सुद्धा महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी आचारसंहितेचा फायदा घेऊन संबंधित कामांचे देयक अदा करण्यात व्यस्त आहेत. असेही मनसेने म्हटले.

ठाणे महानगरपालिकेच्या नालेसफाईचे काम पारदर्शक पद्धतीने करण्यात यावी, यासाठी उपयोजना आखण्याचे काम महानगरपालिकेकडून अपेक्षित असताना महानगरपालिकेचे अधिकारी संगनमत करून घोटाळे झालेल्या कामाचे देयक अदा करत आहेत, हीच शोकांतिका आहे. नव्या आयुक्तांनी याबाबतची चौकशी करावी. अशी मागणी मनसेचे जनहित व विधी विभाग, ठाणे शहराध्यक्ष स्वप्नील महिंद्रकर यांनी केली आहे.

# ठाण्यात रंगला पत्रकारांचा सन्मान सोहळा

## जेष्ठ पत्रकार एस. रामकृष्णन यांना जीवन गौरव पुरस्कार






**ठाणे** : ठाणे जिह्यातील ग्रामीण भागातून आलेल्या जेष्ठ- श्रेष्ठ पत्रकारांच्या उपस्थितीत ठाणे जिल्हा पत्रकार संघाचा भव्य पत्रकार मेळावा आज मोठ्या दिमाखदार पद्धतीने संपन्न झाला. या मेळाव्यात ६० वर्षांपासून आजतागायत पत्रकारिता करणारे पीटीआय, यूएनआय या राष्ट्रीय वृत्तसंस्थांचे जेष्ठ पत्रकार एस. रामकृष्णन यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच जिल्ह्यातील ११ जेष्ठ पत्रकार, छायाचित्रकार आणि कॅमेरामॅन तसेच पत्रकार कल्याण निधी, अधिस्वीकृती समिती, व राज्यस्तरीय आरोग्य समितीवर नियुक्त झालेल्या आठ पत्रकारांना गौरविण्यात आले. ठाणे जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय पितळे यांच्या अध्यक्षतेखाली ठाणे मराठी ग्रंथसंग्रालयाच्या सभागृहात शनिवारी पत्रकार मेळावा झाला. मराठी पत्रकार परिषेदेचे विश्वस्त किरण नाईक, ठाणे जिल्हा माहिती अधिकारी मनोज सानप, जिल्हा पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष विजय वैध, माजी सचिव योगेश त्रिवेदी, माजी माहिती अधिकारी निरंजन राऊत, उपाध्यक्ष तुषार राजे, सरचिटणीस नारायण शेट्टी, सचिव श्रीकांत खाडे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

गेली ७४ वर्ष ठाण्यात वास्तव्य करून ठाणे जिल्ह्यातील घडामोडींचे वार्तांकन करून देशभरात पोहचविण्याचे काम करीत असलेले जेष्ठ पत्रकार एस. रामकृष्णन यांचा प्रमुख पाहुणे किरण नाईक, अध्यक्ष संजय पितळे, मनोज सानप यांच्याहस्ते जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यामध्ये २५ हजारांची थैली, मानपत्र, सन्मानचिन्ह, शॉल, श्रीफळ, फुलगुच्छ यांचा समावेश होता. ठाणे जिल्ह्यातील जडणघडणीत आपल्या लेखणीने योगदान देणारे कल्याणचे जेष्ठ पत्रकार नाना पिसाट, मुरबाडचे जेष्ठ पत्रकार सुधीर पोतदार, ठाण्याचे संपादक राजाराम माने, नवी मुंबईचे जेष्ठ पत्रकार विश्वरथ नायर, शहापूरमधील जेष्ठ पत्रकार प्रकाश परांजपे, भिवंडीच्या जेष्ठ पत्रकार कुसुमताई देशमुख, अंबरनाथमधील जेष्ठ संपादक पांडुरंग रानडे, मीरा-भाईंदरचे जेष्ठ पत्रकार अनिल खेडेकर, जेष्ठ प्रेस छायाचित्रकार दीपक जोशी, आणि ज्येष्ठ कॅमेरामन अशोक गुप्ता यांचा उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. त्याचबरोबर अकरा राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळविणारे मुक्त पत्रकार प्रशांत सिनकर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. राज्य पत्रकार कल्याण निधी समितीवर निवड झालेले जेष्ठ संपादक कैलाश म्हापदी आणि राज्य अधिस्वीकृतीवर निवड झालेले जेष्ठ पत्रकार दिलीप सपाटे, विनोद जगदाळे, जयेश सामंत, संजय पितळे तसेच मुंबई विभाग समितीवरील विभव बिरवटकर आणि कोकण समितीवरील मनोज जालनावाला तसेच आरोग्य समितीवर निवड झालेले पत्रकार कविराज चव्हाण यांचा पाहुण्यांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त किरण नाईक, विजय वैद्य, योगेश त्रिवेदी, कैलास म्हापदी, मनोज सानप आणि मेळाव्याचे अध्यक्ष संजय पितळे यांनी पत्रकार संघाची आगामी वाटचाल आणि पत्रकारांची भूमिका, त्यांच्या कल्याणकारी योजनायासंदर्भात मार्गदर्शन केले.ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी मेळावा आणि जीवनगौरव पुरस्कार विजेते एस. रामकृष्णन यांना पाठविलेला संदेश वाचुन दाखविण्यात आला. कार्यक्रमाची प्रस्तावना आणि सूत्रसंचालन दिलीप शिंदे यांनी केले तर मानपत्राचे वाचन दीपक दळवी यांनी केले. संघाचे सरचिटणीस नारायण शेट्टी यांनी आभारप्रदर्शनकेले.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
www.diwanews.com
सोमवार, दि. १ एप्रिल २०२४


# पाणी बिलांची थकबाकी ठेवणाऱ्या ४४३० नळ जोडण्या वर्षभरात तोडल्या

## १ एप्रिलपासून नळ जोडणी बंद करण्याची कारवाई वेग घेणार

**ठाणे :** जल देयके थकविणाऱ्यांवर ठाणे महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने कारवाई केली असून एप्रिल-२०२३ ते मार्च-२०२४ या काळात ४४३० नळ जोडण्या खंडित करण्यात आल्या आहेत. पाणी बील भरण्याची अंतिम मुदत ३१ मार्चपर्यंत आहे. जे ग्राहक थकबाकी आणि चालू बिल भरणार नाहीत, त्यांच्या नळ जोडण्या तोडण्याची कारवाई एक एप्रिलपासून सुरू करण्यात यणार आहे.

ठाणे महापालिकेला सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात एकूण २०१ कोटी रुपयांची पाणी देयके वसूल होणे अपेक्षित आहे. आतापर्यंत ११४ कोटी रुपये वसूल झाले आहेत. ज्या ग्राहकांनी थकबाकी तसेच चालू वर्षाची पाणी देयके जमा केलेली नाहीत, त्यांनी ३१ मार्चपर्यंत सगळी देयके जमा करून महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

प्रशासकीय आकारात १०० टक्के सूट

जे घरगुती नळसंयोजन धारक ३१ मार्च २०२४पर्यंत थकीत पाणी बील, चालू वर्षाच्या बिलासह एकत्रित जमा करतील, त्यांना त्या थकित बिलावरील प्रशासकीय आकारातून १०० टक्के सवलत दिली जाणार आहे. ही योजना ज्यांनी देयके यापूर्वीच जमा केली आहेत त्यांना, तसेच व्यावसायिक नळ जोडणी धारकांसाठी लागू नाही.

**तक्ता-१**

| प्रभाग समिती | खंडित नळ जोडण्या |
|---|---|
| मुंब्रा | - ९०५ |
| कळवा | - ७९६ |
| नौपाडा-कोपरी | - ६८२ |
| वागळे | - ६६० |
| दिवा | - ५५३ |
| लोकमान्य-सावरकर नगर | - ३९८ |
| उथळसर | -२८३ |
| वर्तकनगर | - ८९ |
| माजिवडा-मानपाडा | - ६४ |
| एकूण | - ४४३० |

**तक्ता-२**

पाणी देयकांची वसुली तक्ता

| प्रभाग समिती | टक्के |
|---|---|
| वर्तकनगर | - ७१.५८ |
| माजिवडा-मानपाडा | - ६६.६१ |
| लोकमान्य-सावरकर नगर | - ६५.९७ |
| उथळसर | - ६४.२४ |
| नौपाडा-कोपरी | - ६१.४३ |
| मुंब्रा | - ५०.६२ |
| कळवा | - ५५.३३ |
| वागळे | - ३९.८१ |
| दिवा | - ३६.८५ |
| एकूण | - ५६.६१ |



ठाणे महानगरपालिकेच्या विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात त्यांचे प्रतिम`स महापालिका आयुक्त तथा प्रशासक सौरभ राव यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त १ संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त २ प्रशांत रोडे, उपायुक्त जी.जी. गोदेपुरे, उमेश बिरारी व महापालिका अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. तद्नंतर मासुंदा तलाव व कळवा नाका येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

# मिनाक्षीताई पाटील यांच्या निधनाने सर्वसामान्यासाठी झटणारे नेतृत्व हरपले- नाना पटोले

**मुंबई-** शेतकरी कामगार पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या, माजी मंत्री मीनाक्षीताई पाटील यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद व वेदनादायी आहे. मिनाक्षीताई पाटील यांनी जनतेच्या प्रश्नावर रस्त्यावर उतरून संघर्ष केला तसेच विधिमंडळातही आवाज उठविला. त्यांच्या निधनाने सर्वसामान्यासाठी झटणारे धडाडीचे नेतृत्व हरपले आहे, अशा शोकभावना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी व्यक्त केल्या आहेत.

मिनाक्षाताई पाटील या लढवय्या नेत्या होत्या. अलिबाग विधानसभा मतदार संघातून त्यांनी तीनवेळा विजय मिळवला होता. विलासराव देशमुख यांच्या सरकारमध्ये त्यांनी राज्यमंत्री म्हणून काम पाहिले. राजकारणाचे बाळकडू त्यांना घरातून मिळाले होते, राजकारणात येण्याआधी त्यांनी पत्रकार म्हणूनही काम केले आहे. मिनाक्षीताई पाटील या एक अभ्यासू नेत्या होत्या तसेच एक उत्तम वक्त्या होत्या. त्यांचा दांडगा जनसंपर्क, मनमिळावू स्वभाव यामुळे सर्वच पक्षात त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी भरीव काम केले आहे.

मिनाक्षीताई पाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी पाटील कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे असे नाना पटोले म्हणाले.

